साहित्य, कला आणि लोकसंस्कृतीला वाहिलेले त्रैमासिक

# तिफण


वर्ष १३ वे, अंक - तिसरा; ऑक्टोबर-नोव्हेंबर-डिसेंबर २०२२

**UGC Care Listed Journal**
**ISSN 2231 - 573X**



● संपादक ●

## डॉ. शिवाजी हुसे

पत्ता : संपादक, तिफण, 'शिवार', श्रीराम कॉलनी, हिवरखेडा रोड,
कन्नड, जि. औरंगाबाद – ४३११०३, मो. ९९०४००३९९८



Sakri (Dhule)
PRINCIPAL

UGC Care Listed Journal, ISSN 2231 - 573X
साहित्य, कला आणि लोकसंस्कृतीला वाहिलेले त्रैमासिक

# तिफण

MAH MAR 34737/13/1/2009-TC
वर्ष १३ वे, अंक - तिसरा; ऑक्टोबर-नोव्हेंबर-डिसेंबर २०२२

## ऊसतोड कामगार विशेषांक

### भाग-१

● संपादक ●
डॉ. शिवाजी हुसे

● अतिथी संपादक ●
डॉ. सुभाष शेकडे    डॉ. अशोक डोळस    डॉ. दिलीप बिरुटे

● संपादक मंडळ ●
डॉ. सर्जेराव जिगे    डॉ. ताहेर पठाण    डॉ. प्रेमला मुखेडकर
डॉ. सुभाष बागल    डॉ. रामचंद्र झाडे    डॉ. रंजना कदम
डॉ. राजकुमार मुसणे    डॉ. दत्तात्रय डुंबरे    डॉ. सुखदेव इघारे

मूल्य : २५० रुपये

या अंकातील लेखकांच्या मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही. या नियतकालिकास महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाकडून अनुदान प्राप्त झाले आहे; परंतु या नियतकालिकात प्रसिद्ध झालेली मते मंडळास मान्य असतीलच असे नाही.

पत्ता : संपादक, तिफण, 'शिवार', श्रीराम कॉलनी, हिवरखेडा रोड,
कन्नड, जि. औरंगाबाद – ४३११०३, मो. ९९०४००३११८



Sakri (Dhule)
PRINCIPAL
T.S.S's Smt.V.U.Patil Arts & Late Dr.B.S.Desale Science College
Sakri, Tal Sakri, Dist.Dhule














# ऊसतोड कामगार, लवाद आणि राजकारण

- डॉ. शरद बाबुराव सोनवणे
सहयोगी प्राध्यापक राज्यशास्त्र विभाग,
श्रीमती विमलबाई उत्तमराव पाटील कला व
कै. डॉ. भास्कर सदाशिव देसले विज्ञान महाविद्यालय, साक्री जि. धुळे
भ. ध्वनी ९४०५१०८१३५, ई-मेल sharadpolsci@gmail.com

**प्रस्तावना**

ऊसतोड कामगार हे वर्षातील सहा महिने घरदार सोडून परराज्यात किंवा परजिल्हयात काम करत असतात; त्यामुळे त्याची दिवाळी देखील रस्त्यावरच होते. अशा या कृषीक्षेत्रात काबाडकष्ट करणाऱ्या कामगारांच्या समस्या देखील विदारक स्वरूपाच्या आहेत. ऊसतोड मजुरांच्या हितासाठी साखर कारखाने, शासन व प्रशासन यांनी स्वप्रेरणेने दखल घेऊन कल्याणकारी योजना राबविणे अपेक्षित असतांना देखील या सर्वच घटकांकडून त्यांच्याकडे दुर्लक्ष्य होते. वेगवेगळ्या राजकीय पक्षांच्या नेतृत्वाकडून आणि पक्ष पुरस्कृत संघनांकडून (काही अपवाद वगळता) केवळ राजकारणासाठी ऊसतोड मजुरांच्या प्रश्नांचे राजकीयीकरण केले जाते. त्यामुळे ऊसतोड मजुरांच्या हिताचे निर्णय हे अनेकदा श्रेयवादाच्या राजकारणातही अडकून बसतात. मात्र या ऊसतोड कामगारांना रात्रंदिवस ऊसाच्या मोळ्यांबरोबरच अनेक समस्यांच्या व दुखाच्या मोळ्या देखील वाहतच राहाव्या लागतात. एकंदरीत ऊसतोड मजुरांच्या विविध मागण्यांसंदर्भात प्रत्यक्ष कृतीपेक्षा राजकारणच अधिक होतांना दिसते.



Sakri (Dhule)
PRINCIPAL
U.Patil Arts &
Dr. B. S. Desale Science College
Sakri, Tal Sakri, Dist.Dhule

म्हणूनच ऊसतोड कामगारांच्या समस्या, लवाद आणि राजकारण याची मीमांसा प्रस्तुत शोधनिबंधात केली आहे.

**ऊसतोड कामगार आणि लवाद**

ऊसतोड मजुरांच्या विविध मागण्यांसंदर्भात मार्ग काढण्यासाठी त्यांचे प्रश्न शासन दरबारी मांडण्याचा एक मार्ग म्हणजे लवाद होय. या लवादामध्ये ऊसतोड मजुरांची बाजू मांडणारा प्रमुख, मुकादम संघटनेचे प्रतिनिधी आणि एकदोन मजूर असतात. तसेच सहकार क्षेत्राची बाजू मांडण्यासाठी या क्षेत्राशी संबधित दोघे जण, अन्य एक प्रतिनिधी असतात. या सर्वांचा मिळून एक तात्पुरता / अल्पकालीन / अस्थायी लवाद असतो. मात्र या लवादाला कोणताही कायदेशीर आधार नाही. लवादामध्ये मजुरांची बाजू मांडणारे राजकीय नेतृत्व म्हणून बबनराव ढाकणे हे 1993 पर्यंत सक्रिय होते. पण गोपीनाथ मुंडे यांचे नेतृत्व पुढे आल्यानंतर 2014 पर्यंत त्यांनीच ऊसतोड मजुरांचे प्रतिनिधित्व केले होते. खासदार शरद पवार हे सहकार क्षेत्राच्या बाजूने राहत होते. गोपीनाथ मुंडे यांच्या पश्चात 2015 सालच्या लवादामध्ये पंकजा मुंडे या मजुरांच्या बाजूने तर जयंत पाटील हे सहकार क्षेत्राच्या बाजूने पुढे आले. या नेतृत्वांच्या बैठकीकडे लवाद म्हणून पाहण्यात आले. आतापर्यंत लवादाचा निर्णय अंतिम ठरत आला आहे आणि मजुरांनी आणि सहकार क्षेत्राने लवादाचे निर्णय मान्य केले आहेत.[1] याप्रकारे संकेतांचे पालन करत दर तीन वर्षांतून एकदा लवाद बसत असे आणि ऊसतोड मजुरांना किती भाववाढ द्यायची याचा निर्णय लवादाच्या चर्चेत घेतला जात असे. मात्र 2015 मध्ये झालेल्या लवादामध्ये पुढील लवाद हा तीन वर्षांऐवजी पाच वर्षांनी असेल असा निर्णय प्रथमच घेण्यात आला होता. राजकीय हितसंबंध डोळ्यांसमोर ठेवून झालेल्या या निर्णयामुळे मजुरांचे नुकसान झाले. कारण 2018 मध्ये पुन्हा लवाद बसून मजुरांना अपेक्षित असलेले ऊसतोड मजुरीचे वाढीव दर त्यांना मिळाले नाही. 2015 च्या लवादानुसार मजुरांना 20 टक्क्यांनी वाढवून देण्यात आलेली मजुरीची दरवाढ ही लगेच 2015 मध्ये न देता 2016 ते 2020 या पाच वर्षांसाठी दिली गेली होती. यासंदर्भात अनेक संघटनांनी 2018 मध्ये शासनाला निवेदने दिल्यामुळे शासनाने लवाद न बसवता मजुरीचे दर पाच टक्क्यांनी वाढवून दिले. 2018 च्या या वाढीनुसार मजुरांच्या प्रतिटन ऊसतोडीच्या मजुरीची दरवाढ 238.50 रुपये झाली. तर मुकादमांचे कमिशन 18.50 टक्के दराने वाढले.[2] (ऊसतोड मजुराने 100 रुपयांची मजुरी केली तर मुकादमांना 18.50 रुपये इतके कमिशन साखर कारखान्यांकडून देण्यात येते.) पण ही एक तात्पुरती व्यवस्था होती, या दरवाढीवर ऊसतोड कामगार संघटना समाधानी नव्हत्या.

2015 च्या लवादाने घेतलेल्या निर्णयानुसार दर तीन वर्षांनी लवाद बसवून ऊसतोड कामगारांच्या मागण्यांचा विचार करून निर्णय घेण्याच्या पारंपारिक संकेताचा भंग केला गेला होता. त्यामुळे वेळीच ऊसतोड कामगार व मुकादमांच्या मागण्यांवर विचार करून निर्णय घेण्याची लवाद नावाची अनौपचारिक यंत्रणा कोलमडली होती. तद्वतच 2015 च्या लवादाने ठरवून दिलेली मुदत 2020 च्या हंगामात संपत असल्याने राज्यातील 12 लाख ऊसतोड कामगारांनी आपल्या विविध मागण्यासाठी ऑक्टोबर 2020 मध्ये 22 दिवस संप पुकारला होता. बांधकाम कामगार कल्याण महामंडळाच्या धर्तीवर ऊसतोडणी कामगार कल्याण महामंडळ स्थापन करण्यात यावे, कामगार मंत्रालय समाजकल्याण मंत्रालय यांच्या अखत्यारीत सदर कामगारांची नोंदणी व्हावी, ते कामगार असल्याचे ओळखपत्र त्यांना द्यावे. साखर कारखाना व्यवस्थापन, मुकादम आणि कामगार यांच्यामध्ये विधिवत संबंध निर्माण व्हावेत. ऊसतोड कामगार हे स्थलांतर करणारे असल्यामुळे त्यांच्या मुलांना विशेष शाळा असाव्यात, त्यांच्या कुटुंबियांना आरोग्य सुविधा आणि उर्वरित सहा महिन्याचे रेशन मिळावे. कामगार म्हणून त्याची कायदेशीर व्याख्या व्हावी असे मूलभूत अधिकार मिळविण्यासाठी ऊसतोड कामगार संघटनांनी संप पुकारला होता.[3]



Sakri (Dhule)
PRINCIPAL
S.S's Smt. V.U.Patil Arts & Late Dr. B.S.Desale Science College
Sakri, Tal Sakri, Dist Dhule

ऊसतोड कामगारांच्या संपावर तोडगा काढण्यासाठी मांजरी येथील वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूट येथे दि. 28 ऑक्टोबर 2020 रोजी राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार राज्याचे सामाजिक न्यायमंत्री धनंजय मुंडे व भाजप नेत्या पंकजा मुंडे यांच्या प्रमुख उपस्थितीत एक महत्त्वाची बैठक होऊन त्यात ऊस कामगारांच्या प्रश्नांवर सखोल चर्चा झाली. यावेळी महसूलमंत्री बाळासाहेब थोरात, सहकार व पणन मंत्री बाळासाहेब पाटील, हर्षवर्धन पाटील, साखर संघाचे अध्यक्ष जयप्रकाश दांडेगावकर, साखर संघाचे संजय खताळ यांच्यासह राज्यातील विविध ऊसतोड कामगार संघटनांचे प्रतिनिधी उपस्थित होते. सामाजिक न्याय विभाग गोपीनाथराव मुंडे ऊसतोड कामगार कल्याण महामंडळाच्या माध्यमातून ऊसतोड कामगारांचे प्रश्न निश्चितपणे सोडवेल, असा आशावाद या बैठकीत शरद पवार यांनी व्यक्त केला. तसेच महामंडळाच्या माध्यमातून ऊसतोड कामगारांचे जास्तीत जास्त प्रश्न व समस्या सोडवण्यासाठी नोव्हेंबरअखेर महामंडळाची नोंदणी करून डिसेंबरपासून महामंडळाचे कामकाज पूर्ण क्षमतेने सूरू करण्याची सूचनाही शरद पवार यांनी केली. गोपीनाथराव मुंडे ऊसतोड कामगार कल्याण महामंडळाचे प्रादेशिक स्तरावर कार्यालय, कंपनी कायद्याअंतर्गत नियमावली बनवणे, ऊसतोड कामगार, पशु, वाहने आदींची नोंदणी करून ओळखपत्र देणे, नवीन पदांना मंजुरी देणे, साखर कारखाने तसेच ऊसतोड कामगारांसाठी नवीन योजना, वैयक्तिक अर्थसहाय्य योजना, ऊसतोड कामगारांच्या मुलांसाठी वसतीगृहे, भोजन योजना, ऊसतोड कामगार महिलांसाठी आरोग्याच्या विविध योजना, त्याचप्रमाणे ऊसतोड कामगार यांच्यासाठी विमा योजना यासह विविध बाबींवर यावेळी सविस्तर चर्चा करण्यात आली. या बैठकीत ऊसतोड कामगार, मुकादम आणि वाहतुकीच्या दरवाढीबाबतचा करार हा 2020-21 ते 2022- 23 या तीन वर्षांच्या कालावधीसाठी करण्यात आला असून ऊसतोडणी कामगारांच्या मजुरीत सरासरी 14 टक्के वाढ[4] (सरासरी 35 ते 45 रु. मजुरी वाढ) करण्यात आली आणि मुकादमाचे कमिशनही 19 टक्के करण्यात आले. तसेच ऊसतोडणी कामगारांसाठीच्या कल्याणकारी स्थापन करावयाच्या महामंडळावर कामगार युनियनचे प्रतिनिधी घेण्याचेही मान्य केले गेल्यामुळे ऊसतोडणी कामगारांनी पुकारलेला संप मागे घेतला.

**ऊसतोड कामगार आणि राजकारण**

ऊसतोडणी मजुरांच्या राजकीय पक्षप्रणीत अनेकविध संघटना कार्यरत आहेत. या सर्व संघटनांमध्ये मजुरांचा समावेश केवळ नावापुरता असून तिथे त्यांचे स्थान दुय्यम आहे. डाव्या पक्षप्रणीत संघटनांचा अपवाद वगळता अन्य सर्वच संघटनांच्या पदाधिकाऱ्यांपैकी बहुसंख्य पदाधिकारी हे मुकादम आहेत. ऊसतोडणी मजुरांमध्ये पन्नास टक्के महिला असूनही एकाही संघटनेमध्ये महिलांना स्थान नाही. याप्रकारे कामगारांच्या वतीने मुकादमांच्या संघटना चालवल्या जात आहेत. परिणामी या संघटनांनी कामगारांच्या हितापेक्षा मुकादमांचे हितसंबंध केंद्रस्थानी ठेवून मागण्या करणे आणि त्या मागण्या पदरात पाडून घेणे या रणनीतीचा अवलंब केला जात आहे. उदाहरणार्थ, प्रत्येक संपादरम्यान केवळ ऊसतोडणी मजुरीतली वाढ आणि मुकादम कमिशन वाढ या दोनच मागण्या लावून धरल्या गेल्या व तडजोडीच्या तत्वावर मान्य करून घेतल्या गेल्या.[5] मजुरांसाठीच्या कल्याणकारी सोयीसवलतींकडे दुर्लक्षच केले गेले आहे.

2015 नंतर ऊसतोडणीची मजुरी वाढवण्यासाठी लवाद नेमला गेलेला नाही व लवादाने ठरवून दिलेली मुदत 2020 च्या हंगामात संपत असल्याने याकाळात मजुरांच्या वतीने कार्यरत असलेल्या विविध संघटनांनी ऊसतोडणी मजुरीतील वाढीसाठी आणि इतर मागण्यांसाठी संप पुकारल्यावर ठिकठिकाणी ऊसतोडणी मजुरांच्या वतीने राजकीय नेतृत्वाकडून विविध संघटनांच्या पदाधिकाऱ्यांच्या आणि मुकादमांच्या बैठका घेऊन या संपामध्ये पक्षनिहाय पुढाकार घेतला होता. उदाहरणार्थ, भाजपप्रणीत आमदार सुरेश धस यांनी विविध ठिकाणी बैठका घेतल्या. तसेच इतर राजकीय पक्षांच्या नेत्यांनी देखील मजुरांच्या व मुकादमांच्या



Sakri (Dhule)
PRINCIPAL
L.B.S's Late V.U.Patil Arts & Late Dr.B.S.Desale Science College
Sakri, Tal Sakri, Dist.Dhule

गाठीभेटी घेऊन एकप्रकारे जनसंपर्क अभियान सुरू केले होते. डाव्या पक्षप्रणीत संघटनांचा अपवाद वगळता अन्य सर्वचे पुढारी आणि संघटनांनी केवळ ऊसतोड कामगारांना मागील पाच वर्षातल्या अंतरिम वाढीसह मजुरीत 150 टक्क्यांची वाढ करण्यात यावी आणि मुकादमांचे कमिशन 37 टक्क्यांपर्यंत वाढवावे, या दोनच मागण्या[6] पुढे केल्या होत्या.

सीटू प्रणीत डाव्या संघटनांकडून मात्र ऊसतोड कामगारांच्या हिताच्या व्यापक मागण्या केल्या गेल्या होत्या. त्यातील प्रमुख मागण्या पुढीलप्रमाणे आहेत.

1) ऊसतोड कामगारांना प्रतिटन 400 रुपये दराने मजुरी मिळावी.
2) मुकादम कमिशन 35 टक्के वाढवले जावे.
3) सर्व मजुरांना ओळखपत्र आणि सेवापुस्तिका देण्यात यावी.
4) मजुरांसाठी कल्याणकारी महामंडळ सुरू करावे.
5) बसपाळी भत्ता सुरू करावा, बसपाळीच्या दिवशी गाडीभाडे घेतले जाऊ नये.
6) अपघात विमा लागू केला जावा.
7) झोपडी आणि जनावरे यांचा विमा काढला जावा.
8) विम्याच्या प्रिमिअमची 50 टक्के रक्कम साखर कारखान्यांनी तर 50 टक्के रक्कम राज्य शासनाने भरावी.
9) साखर कारखान्यांवर जाण्यापूर्वीच सहा महिन्यांचा शिधा मिळावा.
10) राज्याबाहेर जाणाऱ्या मजुरांची नोंद ठेवली जावी.
11) गर्भपिशवी काढलेल्या ऊसतोड मजूर महिलांना अपंगत्वाचे प्रमाणपत्र देण्यात यावे.
12) काम न होणाऱ्या ऊसतोड कामगार महिलांना पेन्शन द्यावी.
13) लवादाची मुदत पुन्हा तीन वर्षे केली जावी.
14) साखर कारखान्यांवरच शौचालय, पक्के घर शुद्ध पाणी, आरोग्यसुविधा यांसारख्या पायाभूत सोयीसुविधा उपलब्ध करुन देण्यात याव्यात[7] आदी मागण्या करण्यात आल्या होत्या.

ऊस तोडणी कामगारांच्या मजुरीत वाढ करण्याच्या विषयावर मांजरी येथील वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूट येथे बैठक आयोजित करण्यात आलेल्या बैठकीला धनंजय मुंडे आणि पंकजा मुंडे दोघेही हजर होते. बैठकीनंतर पत्रकारांशी बोलताना पंकजा मुंडे म्हणाल्या, 'ऊस तोडणी कामगारांचे नेतृत्व महत्त्वाचे नाही. या कामगारांचे पालकत्व महत्त्वाचे आहे आणि ते माझ्याकडे आहे. यावेळी मी कामगारांना कामावर जाण्यास सांगितल्यावर खरे कामगार हे कामावर गेले. काहीजणांनी विसंगती घडविण्याचा प्रयत्न केला. पण त्याचा काही उपयोग झाला नाही, असे पंकजा म्हणाल्या. तर काहीजण पराभव साजरा करायला येतात, अशी टीका धनंजय मुंडे यांनी केली होती.[8] वरील दोन्ही नेत्यांच्या विधानांमध्ये उसतोड कामगारांच्या हिताच्या विचारापेक्षा राजकीय स्पर्धा व शह-काट शहाचे राजकारणच अधिक असल्याचे दिसत होते आही हेच सूत्र सुरेश धस यांच्याबाबतीतही लागू होते. कारण त्यांचे संपाला असलेले प्रोत्साहन हे पक्षांतर्गत संघर्षाचा एक भाग होता. कारण गोपीनाथ मुंडे यांच्या निधनानंतर पंकजा मुंडे यांच्याकडे उसतोड कामगारांच्याही नेत्या म्हणून पहिले जाऊ लागले होते, त्यास छेद देण्यासाठी त्यांच्या भाजप या पक्षातीलच विरोधकांनी सुरेश धस यांच्या रूपाने एक समांतर नेतृत्व पुढे आणण्याचा प्रयत्न केला होता. एकंदरीत सर्वच प्रमुख राजकीय पक्ष है। उसतोड कामगारांचे प्रश्न प्रामाणिकपणे सोडविण्यापेक्षा या मुद्द्याचे राजकीयीकरण करून त्याचा राजकीय लाभ उठविण्यासाठीच प्रयत्नशील असल्याचे दिसून येतात.

भाजपचे दिवंगत नेते गोपीनाथ मुंडे यांच्या नावाने महाराष्ट्रात उसतोड कामगारांसाठी कल्याण मंडळाची घोषणा करण्यात आली होती. दि. 3 एप्रिल, 2022 रोजी पुणे येथे या लोकनेते गोपीनाथराव मुंडे ऊसतोड कामगार कल्याण मंडळाच्या मुख्य कार्यालयाचं उद्घाटन झाले. यावेळी बोलतांना धनंजय मुंडे यांनी म्हटले की, लोकनेते गोपीनाथ मुंडे साहेबांनी संपूर्ण आयुष्यभर ऊसतोड कामगारांच्या कल्याणासाठी काम केलेले असून ऊसतोड कामगारांसाठी एखादे कल्याणकारी महामंडळ असावे, असे त्यांना देखील वाटत होते की, पण त्यांच्या राजकीय



Sakri (Dhule)
PRINCIPAL
Smt. V.U.Patil Arts & Late Dr.B.S.Desale Science College
Sakri, Tal Sakri, Dist.Dhule

कारकिर्दीत ते झाले नाही. मात्र त्यांच्या वारसदारांना संधी मिळाली असतांना देखील त्यांच्याकडून हे काम झाले नाही; अशा शब्दात धनंजय मुंडे यांनी पंकजा मुंडे यांचे नाव न घेता त्यांच्यावर टीका केली. पुढे ते असेही म्हणाले की, "माझ्या जीवनातील आजचा दिवस हा सुवर्ण अक्षराने लिहावा असा आहे. लोकनेते गोपीनाथराव मुंडे ऊसतोड कामगार मंडळाची स्थापनाच नाही तर त्याच्या मुख्य कार्यालयाचे उदघाटन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते झाले आहे."[9] याआधी महाविकास आघाडीच्या नेतृत्वातील राज्य सरकारने आपल्या पहिल्या अर्थसंकल्पात ऊसतोड मजुराच्या मंडळाची घोषणा केली होती आणि भविष्यात कोणत्याही प्रकारची आर्थिक अडचणी येऊ नये यासाठी राज्यात गाळप होणाऱ्या प्रत्येक टनामागे 10 रुपये ऊसतोड कामगाराच्या कल्याणासाठी ऊस कारखानदाराने ठेवण्याचा आणि राज्य सरकार मार्फत देखील 10 रुपये ठेवण्याचा निर्णय सरकारने घेतल्यामुळे भविष्यात कधीही या मंडळाला पैशाची कमी पडणार नाही. या मंडळामार्फत राज्यातील ऊसतोड कामगारांच्या कुटुंबीयांची विशेष काळजी घेतली जाणार असून त्यांच्या मुलांच्या पदवीपर्यंत शिक्षण कसे होईल हे पाहिले जाणार असल्याचे मुंडे यांनी यावेळी नमूद केले होते.[10] अर्थात या राजकीय घोषणा किंवा निर्णयांना शासकीय पातळीवर गांभीर्याने घेतले जाईल की नाही, हा प्रश्न मात्र अनुत्तरीतच राहतो. कारण ऊसतोड कामगारांचे प्रश्न खरोखर सोडविले गेले पाहिजे, हे सर्वच राजकीय पक्षांना वाटणे व त्यासाठी आवश्यक राजकीय इच्छाशक्ती त्यांनी प्रत्यक्ष कृतीतून दाखवून देणे गरजेचे असते.

**राजकारणात अडकणाऱ्या ऊसतोड कामगार कल्याणाच्या योजना**

राज्यकर्ते व राजकीय पुढारी हे ऊसतोड कामगारांच्या कल्याणासाठी विविध घोषणा करतांना दिसतात, पण प्रत्यक्षात अंमलबजावणीच्या बाबतीत मात्र शासन व प्रशासनाकडून या निर्णयांना वाटण्याच्या अक्षदा लावल्या जातात आणि केलेल्या घोषणा केवळ कागदावरच राहतात. परिणामी त्यांची अंमलबजावणी करण्यासाठी व विविध प्रलंबित मागण्यासंबधी निर्णय व्हावा यासाठी ऊसतोड कामगारांच्या संघटनांना सतत संघर्ष करावा लागतो. याचाच भाग म्हणून महाराष्ट्र ऊसतोडणी व वाहतूक कामगार संघटना सिटूच्या वतीने ऊसतोड कामगार कल्याणकारी महामंडळाची अंमलबजावणी करावी तसेच वाहन मालक, मुकादम आणि कामगारांच्या प्रलंबित प्रश्नांसाठी पुणे साखर आयुक्त कार्यालयावर दि. 20 सप्टेंबर 2022 रोजी धडक मोर्चा काढण्यात आला होता. राज्यातील हजारो ऊसतोड कामगार या मोर्चात सहभागी झाले होते. महाराष्ट्र शासनाच्या वतीने लोकनेते गोपीनाथ मुंडे ऊसतोड कामगार कल्याण महामंडळाच्या पुणे येथील मुख्य कार्यालयाचे दि. 3 एप्रिल 2022 रोजी उद्घाटन झाले व सर्व ऊसतोड कामगारांच्या मुला-मुलींच्या शिक्षणासाठी 80 निवासी वस्तीगृह व आश्रम शाळा सुरू करण्याचे नियोजन शासनाने जाहीर केले होते. मात्र याबाबत अंमलबजावणी झाली नाही. तसेच महामंडळाच्या सर्व सेवा सुविधा या ऊसतोड कामगार, गाडीवान, मुकादम व ऊस वाहतूकदार यांना हंगामापूर्वी लागू कराव्यात आणि ऊसतोड कामगार, वाहन मालक, मुकादम यांच्या कारखान्याकडे असलेल्या थकीत रकमा त्वरित मिळाव्यात या व अन्य न्याय्य मागण्यासाठी[11] साखर आयुक्त कार्यालय पुणे येथे धडक मोर्चा काढण्यात आला होता. याप्रकारे ऊसतोड कामगारांसाठी काही निर्णय घेण्याचे सोपस्कार पार पाडले जात असले तरी प्रत्यक्षात अंमलबजावणीच्या बाबतीत मात्र दिरंगाई केली जाते. म्हणून एकीकडे राज्यकर्त्यांनी आपल्या मागण्यांना दाद द्यावी यासाठी ऊसतोड मजुरांना झगडावे लागते तर दुसरीकडे त्यावर निर्णय झाल्यावर देखील त्याची अंमलबजावणी करावी यासाठीही त्यांना सतत संघर्ष करावा लागतो.

**निष्कर्ष व उपाययोजना**

ऊसतोड मजुर आपल्या लहान लहान चिमुकल्यांसह ऊसाच्या फडात वर्षातील सहा महिने प्रतिकूल परिस्थितीत राहतात. त्यांच्या संघर्षमय



Sakri (Dhule)
PRINCIPAL
I.S.S's Smt. V.U.Patil Arts & Late Dr.B.S.Desale Science College
Sakri, Tal Sakri, Dist.Dhule

जीवनातील विविध समस्यांचे केवळ राजकीय भांडवल करुन राजकारण न करता वेगवेगळ्या राजकीय पक्षातील पुढाऱ्यांनी खऱ्या अर्थाने ऊसतोड मजुरांच्या हितासाठी वेगवेगळ्या पातळ्यांवर झगडणे अभिप्रेत आहे. बहुतांशी ऊसतोड मजुर हे निरक्षर किंवा अर्धशिक्षित असल्यामुळे त्यांचे होत असल्याले शोषण देखील अनेकदा त्यांच्या लक्षात येत नाही. म्हणून या भोळ्याभाबड्या कष्टकरी लोकांना संपूर्ण जीवन विपरीत परीस्थित जगावे लागू नये यासाठी राजकीय पुढाऱ्यांनी केवळ मतांचे राजकारण न करता ऊसतोड कामगारांच्या मागण्या मार्गी लावणे आवश्यक आहे. तरच त्यांच्या भावी पिढ्यांच्या आयुष्यात विकासाच्या संधी निर्माण होऊ शकतील, नसता त्यांच्या मुलांच्या हाती देखील पेन वही ऐवजी कोयताच येईल. म्हणून ऊसतोड मजुरांच्या मजुरीवाढपासून इतर तितक्याच महत्वाच्या असणाऱ्या आरोग्यविषयक, शैक्षणिक, सामाजिक, सुरक्षाविषयक आणि अन्य अनुषंगिक समस्या पुढे आणण्याची नितांत आवश्यकता आहे. शासनाने कष्टकरी ऊसतोड कामगारांच्या व त्यांच्या भावी पिढ्यांच्या कल्याणासाठी काही कायमस्वरूपी धोरणे आखून त्यांची प्रामाणिकपणे अंमलबजावणी करने नितांत गरजेचे आहे. याप्रक्रियेत नोकरशाहीनेही मानवतावादी, कल्याणकारी व विकास प्रशासनाचा दृष्टीकोन डोळ्यासमोर ठेवुन अंमलबजावणीच्या पातळीवर हस्तक्षेपाची भूमिका घेणे गरजेचे आहे. राजकीय पक्षांनी आणि नेत्यांनी ऊसतोड कामगारांकडे केवळ 'व्होटबँक' म्हणून न पाहता निवडणूक प्रक्रियेत ऊसतोड कामगारांच्या कल्याणाच्या मुद्द्यांना आपल्या निवडणूक जाहीरनाम्यात अंतर्भूत करून निवडनुकीनंतर त्या घोषणांवर ठोस धोरणात्मक निर्णय घेण्याची गरज आहे.

**संदर्भ :**


1. सोमिनाथ घोळवे, ऊसतोडणी मजुरांचा संप मूलभूत मागण्यांकडे दुर्लक्ष का?, कर्तव्य साधना, दि. 28 सप्टेंबर 2020 https://kartavyasadhana.in/view-article/oos-todani-kamgar-strike-writes sominath-gholwe
2. कित्ता
3. https://maharashtrajanbhumi.in/behind-the-strike-of-sugarcane-harvesting-workers-these-were-demands /?amp
4. महाराष्ट्र टाइम्स, दि. 28.10.2020 https://maharashtratimes.com/maharashtra/pune-news/meeting-of-sharad-pawar-dhananjay-and-pankaja-munde-on-the-issues-of-sugarcane-harvesting-workers/articleshow/78896362.cms
5. सोमिनाथ घोळवे, उपरोक्त क्र. 1
6. कित्ता
7. कित्ता
8. महाराष्ट्र टाइम्स, दि. 28.10.2020 https://maharashtratimes.com/maharashtra/pune-news/pankaja-munde-criticizes-dhananjay-munde/articleshow/78898931.cms
9. मुंबई Tak, दि. 4 एप्रिल, 2022 https://www.mumbaitak.in/news/ncp-leader-dhananjay-munde-takes-a-dig-at-his-sister-and-bjp-leader-pankaja-munde-in-pune
10. कित्ता
11. सायं. दैनिक रिपोर्टर (बीड) दि. 20 सप्टेंबर 2022 https://beedreporter.com/news/2727/?amp=1




** ** *



Sakri (Dhule)

PRINCIPAL
S.S.'s Smt. V.U.Patil Arts & Late Dr. B. S. Desale Science College
Sakri, Tal Sakri, Dist.Dhule